नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर या कार्यालयाचा आकृतीबंध व पदांवरील नियुक्तीच्या अटी व शर्ती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: एनआरडी-३३१९/प्र.क्र.०२/नवि-३५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ : **१)** महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना दि.०४/०३/२०१७.
२) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सभा १० वी बैठक ठराव क्र.०४/१०/२०/१०/२०२५, दि.२०/१०/२०२५.

प्रस्तावना :

महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा.३) चे कलम ३ चे उप-कलम (१) अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर या प्राधिकरणाची स्थापना अधिसूचना दि.०४ मार्च, २०१७ अन्वये करण्यात आली आहे. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे एकुणच विस्तारीत कामकाज विचारात घेता, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सभेच्या १०व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार १५६ पदांच्या सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. त्यानुसार सदर पदांना मान्यता देण्याची व पदांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आकृतीबंधाच्या अनुषंगाने शासनाने यापूर्वी मंजूरी दिलेले सर्व आदेश या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या **१६० तांत्रिक व अतांत्रिक पदांच्या आकृतीबंधास** या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

३. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मंजूर पदांचा गट निहाय तपशिल परिशिष्ट-"अ" नुसार आहे.

४. महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ च्या कलम १२ पोटकलम १, २ व ३ मधील तरतुदीनुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी मंजूर करण्यात आलेल्या १६० पदांचा विभागनिहाय पदसंख्या व नियुक्तीचा मार्गाचा तपशिल सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "ब" नुसार मंजूर करण्यात येत आहे.

५. सदर मंजूर पदांवर नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांची शैक्षणिक अर्हता व नियुक्तीच्या इतर अटी व शर्ती परिशिष्ट "क" नुसार मंजूर करण्यात येत आहे.

६. सदर आकृतिबंधामधील परिशिष्ट "ब" मध्ये करण्यात आलेली पदांची विभागणी ही केवळ प्रशासकीय कार्याच्या सुलभीकरणासाठी व कार्यालयीन सोयीच्या दृष्टीने करण्यात आलेली असून, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ मधील कलम १२(३) अन्वये प्राधिकरणांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्ती व अंतर्गत बदली /पदभार संबंधीचे अंतिम अधिकार महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे निहित राहतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२१६१६५१२५२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUBRAO
NARAYAN SHINDE

Digitally signed by SUBRAO NARAYAN SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Urban Development Department,
2.5.4.20=FFA7B5A27FAED7560194E6272933CFA60DCA1EB8AB5485
9EAE7920C9D0D1F622, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E5BB5862D0E131A274D92F7A1ACEF953E01301C1B0
FB615DC6CCE4812BDED257, cn=SUBRAO NARAYAN SHINDE
Date: 2026.08.12 16:18:28 +05'30'

(सुबराव ना. शिंदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई .
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.
७. महा संचालक , माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
८. उपसचिव (कार्यासन-१०/कार्यासन-१४/कार्यासन-३४),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उपसचिव, महसूल व वन विभाग/गृह विभाग/वित्त विभाग/कृषी व पदुम विभाग (कृषी) / सार्वजनिक बांधकाम विभाग/मृद व जलसंधारण विभाग , मंत्रालय, मुंबई.
१०.संचालक, लेखा व कोषागरे संचालनालय, मुंबई .
११.संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, पुणे .
१२.अवर सचिव , नवि-२७/नवि-१४ , नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (नवि-३५).

शासन निर्णय क्रमांक: एनआरडी-३३१९/प्र.क्र.०२/नवि-३५ दिनांक : १२ ऑगस्ट, २०२६

परिशिष्ट-अ

अ.क्र.	पदनाम	प्रस्तावित पदांची संख्या
१	२	३
१.	महानगर आयुक्त	१
२.	मुख्य अभियंता	१
३.	मुख्य अग्निशमन अधिकारी	१
४.	महानगर नियोजनकार (विकास परवानगी)	१
५.	सह आयुक्त (प्रशासन)	१
६.	सहाय्यक संचालक, नगर रचना	२
७.	अधिक्षक अभियंता (स्थापत्य)	२
८.	कार्यकारी अभियंता (स्थापत्य)	६
९.	व्यवस्थापक विपणन	१
१०.	सह महानगर नियोजनकार	१
११.	उप आयुक्त (अनधिकृत बांधकाम/ जमीन मालमत्ता)	२
१२.	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	१
१३.	उप अभियंता (स्थापत्य)	१२
१४.	उप महानगर नियोजनकार	४
१५.	माहिती व जनसंपर्क अधिकारी	१
१६.	मुख्य विधी अधिकारी	१
१७.	तहसिलदार	२
	एकूण गट- अ	**४०**
	गट- ब	
१८.	कक्ष अधिकारी	१
१९.	वृक्ष अधिकारी	१
२०.	विभागीय अग्निशमन अधिकारी	१
२१.	लेखाधिकारी	१
२२.	सहायक महानगर नियोजनकार	११
२३.	अग्निशमन केंद्र अधिकारी	२

अ.क्र.	पदनाम	प्रस्तावित पदांची संख्या
१	२	३
२४.	सहाय्यक लेखाधिकारी	१
२५.	उप अधिक्षक भूमी अभिलेख	१
२६.	स्वीय सहाय्यक लघुलेखक उच्चश्रेणी	१
२७.	सहाय्यक अभियंता (श्रेणी-२)/ शाखा अभियंता(स्थापत्य)	३६
२८.	मुख्य आरेखक	१
	एकूण गट- ब	५७
	गट- क	
२९.	सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी	२
३०.	उद्यान सहाय्यक	१
३१.	अधिक्षक	१
३२.	रचना सहाय्यक	४
३३.	उपअधीक्षक/उप-लेखापाल	४
३४.	सहाय्यक आरेखक	२
३५.	कनिष्ठ आरेखक	२
३७.	अनूरेखक	४
३८.	वरिष्ठ लिपीक	१४
३९.	लिपीक टंकलेखक	२५
४०.	भूकरमापक (सर्व्हेअर)	२
४१.	वाहन चालक	२
	एकूण गट- क	६३
	गट- ड	
	एकूण गट- ड	०
	एकूण गट- अ + ब + क + ड	१६०

(सुबराव ना. शिंदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट – ब

१. मा. महानगर आयुक्त यांचे कार्यालय							
अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	महानगर आयुक्त	शासनाचे सचिव किंवा त्यावरील पद	Cadre Post			१	भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिका-यांमधुन प्रतिनियुक्तीने
२	व्यवस्थापक विपणन	व्यवस्थापक विपणन	S-२०	५६१००	१७७५००	१	बाह्यस्त्रोताद्वारे
३	स्वीय सहायक लघुलेखक (उ.श्रे)	लघुलेखक (उ.श्रे)	S-१६	४४९००	१४२४००	१	शासनाच्या इतर विभागातून प्रतिनियुक्तीने
४	वरिष्ठ लिपीक	वरिष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नती/ प्रतिनियुक्तीने
५	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	२	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्तीने
६	वाहनचालक	वाहनचालक	S-६	१९९००	६३२००	२	बाह्यस्त्रोताद्वारे
			एकूण			०८	

२- प्रशासन, मानव संसाधन व आस्थापना विभाग							
अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	सह आयुक्त (प्रशासन)	सह सचिव/उप सचिव/ अतिरीक्त जिल्हाधिकारी/ अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) दर्जाचे प्रशासन सेवेतील अधिकारी	S-२७	११८५००	२१४१००	१	मंत्रालय स्तरावरील सह सचिव/उप सचिव दर्जाचे अधिकारी / अतिरीक्त जिल्हाधिकारी/ अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) दर्जाचे प्रशासन सेवेतील अधिका-यांमधुन प्रतिनियुक्तीने
			S-२५	७८८००	२०९२००		
२	कक्ष अधिकारी	कक्ष अधिकारी/सहाय्यक आयुक्त	S-१७	४७६००	१५११००	१	मंत्रालय स्तरावरील संवर्गामधून कक्ष अधिकारी / मुख्याधिकारी श्रेणी-२ अथवा राज्यशासनातील प्रशासकीय सेवेतील समकक्ष दर्जाचे अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने

३	वरिष्ठ लिपीक	वरीष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	४	पदोन्नती/प्रतिनियुक्तीने
४	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	६	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्तीने
					एकूण	१२	
	३- विकास परवानगी विभाग						
अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	महानगर नियोजनकार	सह संचालक, नगर रचना	S-२७	११८५००	२१४१००	१	सहसंचालक या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनालयातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
२	सहाय्यक संचालक, नगर रचना	सहाय्यक संचालक, नगर रचना	S-२३	६७७००	२०८७००	१	सहा. संचालक, नगर रचना या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
३	उप महानगर नियोजनकार	नगर रचनाकार, नगर रचना	S-२०	५६१००	१७७५००	२	नगर रचनाकार या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
४	सहाय्यक महानगर नियोजनकार	सहाय्यक नगर रचनाकार, नगर रचना	S-१५	४१८००	१३२३००	८	सहाय्यक नगर रचनाकार या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
५	वृक्ष अधिकारी	वृक्ष अधिकारी	S-१५	४१८००	१३२३००	१	वन परिक्षेत्र अधिकारी, वन विभाग किंवा कृषी अधिकारी , कृषी विभाग या गट -ब अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
६	रचना सहाय्यक	रचना सहाय्यक	S-१४	३८६००	१२२८००	२	रचना सहाय्यक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
७	मुख्य आरेखक	मुख्य आरेखक	S-१५	४१८००	१३२३००	१	पदोन्नतीने अथवा मुख्य आरेखक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील समकक्ष दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने

८	सहाय्यक आरेखक	सहाय्यक आरेखक	S-१०	२९२००	९२३००	१	पदोन्नतीने अथवा सहाय्यक आरेखक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील समकक्ष दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
९	कनिष्ठ आरेखक	कनिष्ठ आरेखक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नतीने अथवा कनिष्ठ आरेखक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील समकक्ष दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
१०	उद्यान सहाय्यक	उद्यान सहाय्यक	S-८	२५५००	८११००	१	वनरक्षक , वन विभाग किंवा कृषी सहाय्यक, कृषी विभाग या पदांवरील कर्मचा-यांमधून प्रतिनियुक्तीने
११	अनूरेखक	अनूरेखक	S-७	२१७००	६९१००	२	नामनिर्देशनाने अथवा अनूरेखक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील समकक्ष दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
१२	वरिष्ठ लिपीक	वरिष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नती / प्रतिनियुक्तीने
१३	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	१	नामनिर्देशन / प्रतिनियुक्तीने
					एकूण	२३	
	४- नियोजन विभाग						
अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	सह महानगर नियोजनकार	उपसंचालक,नगर रचना	S-२५	७८८००	२०९२००	१	उपसंचालक या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनालयातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
२	सहाय्यक संचालक, नगर रचना	सहाय्यक संचालक, नगर रचना	S-२३	६७७००	२०८७००	१	सहाय्यक संचालक, नगर रचना या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनालयातील अधिका-यांमधून

							प्रतिनियुक्तीने
३	उप महानगर नियोजनकार	नगर रचनाकार, नगर रचना	S-२०	५६१००	१७७५००	२	नगर रचनाकार या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
४	सहाय्यक महानगर नियोजनकार	सहाय्यक नगर रचनाकार, नगर रचना	S-१५	४१८००	१३२३००	३	सहाय्यक नगर रचनाकार या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनालयातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
५	रचना सहाय्यक	रचना सहाय्यक	S-१४	३८६००	१२२८००	२	रचना सहाय्यक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
६	सहाय्यक आरेखक	सहाय्यक आरेखक	S-१०	२९२००	९२३००	१	पदोन्नतीने अथवा सहाय्यक आरेखक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील समकक्ष दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
७	कनिष्ठ आरेखक	कनिष्ठ आरेखक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नतीने अथवा कनिष्ठ आरेखक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील समकक्ष दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
८	अनूरेखक	अनूरेखक	S-७	२१७००	६९१००	२	नामनिर्देशनाने अथवा अनूरेखक, या पदावरील नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनायातील समकक्ष दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने
९	वरिष्ठ लिपीक	वरिष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नती / प्रतिनियुक्तीने
१०	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	१	नामनिर्देशन / प्रतिनियुक्तीने
					एकूण	१५	

५- अभियांत्रिकी विभाग

अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर	मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग

१	मुख्य अभियंता (स्थापत्य)	मुख्य अभियंता (स्थापत्य)	S-२९	१३११००	२१६६००	१	प्रतिनियुक्तीने (राज्यशासना मधील सार्वजनिक बांधकाम विभाग समकक्ष संवर्गामधील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने)
२	अधिक्षक अभियंता (स्थापत्य)	अधिक्षक अभियंता (स्थापत्य)	S-२५	७८८००	२०९२००	२	पदोन्नती ५०% , प्रतिनियुक्ती ५०% (राज्यशासना मधील सार्वजनिक बांधकाम विभागातील समकक्ष संवर्गामधील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने)
३	कार्यकारी अभियंता(स्थापत्य)	कार्यकारी अभियंता (स्थापत्य)	S-२३	६७७००	२०८७००	६	पदोन्नती ५०% , प्रतिनियुक्ती ५०% (राज्यशासना मधील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) समकक्ष संवर्गामधील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने)
४	उप अभियंता (स्थापत्य)/ सहाय्यक अभियंता श्रेणी -१	उप अभियंता (स्थापत्य) / सहाय्यक अभियंता श्रेणी -१ (स्थापत्य)	S-२०	५६१००	१७७५००	१२	पदोन्नती ५०% , प्रतिनियुक्ती ५०% (राज्यशासना मधील उप अभियंता (स्थापत्य) समकक्ष संवर्गामधील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने)
५	सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) (स्थापत्य)	सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) / शाखा अभियंता(स्थापत्य)	S-१५	४१८००	१३२३००	३२	नामनिर्देशन १००%/ (राज्यशासना मधील सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) समकक्ष संवर्गामधील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने)
६	वरिष्ठ लिपीक	वरिष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	२	पदोन्नती / प्रतिनियुक्तीने
७	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	६	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्तीने
					एकूण	६१	
६- अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग							
अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग

१	उप आयुक्त (अनधिकृत बांधकाम)	उप जिल्हाधिकारी	S-२३	६७७००	२०८७००	१	उपजिल्हाधिकारी/उपजिल्हाधिकारी(निवड श्रेणी), महसूल विभाग या अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने
			S-२०	५६१००	१७७५००		
२	तहसिलदार (अनधिकृत बांधकाम)	तहसिलदार	S-१९	५५१००	१७५१००	१	तहसिलदार महसूल विभाग या वर्गामधील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने
३	सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) / शाखा अभियंता (स्थापत्य)	सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) /शाखा अभियंता (स्थापत्य)	S-१५	४१८००	१३२३००	४	नामनिर्देशन अथवा प्रतिनियुक्तीने (राज्यशासना मधील सहायक अभियंता श्रेणी-२/ शाखा अभियंता (स्थापत्य) समकक्ष संवर्गामधील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने)
४	वरिष्ठ लिपीक	वरिष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नती / प्रतिनियुक्तीने
५	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	२	नामनिर्देशन / प्रतिनियुक्तीने
					एकूण	०९	

७- जमीन व मालमत्ता विभाग

अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	उप आयुक्त (जमीन व मालमत्ता)	उप जिल्हाधिकारी	S-२३	६७७००	२०८७००	१	उपजिल्हाधिकारी / उपजिल्हाधिकारी (निवड श्रेणी), महसूल विभाग या अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने
			S-२०	५६१००	१७७५००		
२	तहसिलदार	तहसिलदार	S-१९	५५१००	१७५१००	१	तहसिलदार महसूल विभाग या वर्गामधील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने
३	उप अधिक्षक भूमी अभिलेख	उप अधिक्षक भूमी अभिलेख	S-१५	४१८००	१३२३००	१	उप अधिक्षक भूमी अभिलेख या पदावरील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने
४	अधिक्षक	अधिक्षक	S-१४	३८६००	१२२८००	१	पदोन्नती/प्रतिनियुक्ती
५	उप अधिक्षक	उपअधिक्षक	S-१३	३५४००	११२४००	२	वरिष्ठ लिपीक मधून पदोन्नतीने /प्रतिनियुक्ती
६	वरिष्ठ लिपीक	वरिष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नती/प्रतिनियुक्ती

७	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	२	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्ती
८	सर्व्हेअर/ भूकरमापक	सर्व्हेअर/ भूकरमापक	S-६	१९९००	६३२००	२	प्रतिनियुक्ती
					एकूण	११	

८- लेखा व वित्त विभाग

अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	उपसंचालक, म.वि.व.ले.से.	S-२३	६७७००	२०८७००	१	उपसंचालक, म.वि.व.ले.से. या संवर्गातून प्रतिनियुक्तीने
२	लेखाधिकारी	लेखाधिकारी, म.वि.व.ले.से.	S-१६	४४९००	१४२४००	१	लेखाधिकारी, म.वि.व.ले.से. या संवर्गातून प्रतिनियुक्तीने
३	सहायक लेखाधिकारी	सहा. लेखाधिकारी, म.वि.व.ले.से.	S-१५	४१८००	१३२३००	१	सहायक लेखाधिकारी, म.वि.व.ले.से. या संवर्गातून प्रतिनियुक्तीने
४	उपअधिक्षक/ उपलेखापाल	उपअधिक्षक/उपलेखापाल	S-१३	३५४००	११२४००	२	वरिष्ठ लिपीक संवर्गामधून पदोन्नतीने/प्रतिनियुक्ती
५	वरिष्ठ लिपीक	वरिष्ठ लिपीक	S-८	२५५००	८११००	२	पदोन्नती/प्रतिनियुक्ती
६	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	२	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्ती
					एकूण	०९	

९- अग्निशमन विभाग

अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	मुख्य अग्निशमन अधिकारी	मुख्य अग्निशमन अधिकारी	S-२३	६७७००	२०८७००	१	पदोन्नती/ प्रतिनियुक्ती
२	विभागीय अग्निशमन अधिकारी	विभागीय अग्निशमन अधिकारी	S-१६	४४९००	१४२४००	१	पदोन्नती/ प्रतिनियुक्ती

३	अग्निशमन केंद्र अधिकारी	अग्निशमन केंद्र अधिकारी	S-१५	४१८००	१३२३००	२	पदोन्नती/ प्रतिनियुक्ती
४	सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी	सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी	S-१४	३८६००	१२२८००	२	नामनिर्देशन / प्रतिनियुक्ती
५	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	१	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्ती
					एकूण	०७	

१०- माहिती व जनसंपर्क विभाग

अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	माहिती व जनसंपर्क अधिकारी	माहिती व जनसंपर्क अधिकारी	S-१८	४९१००	१५५८००	१	प्रतिनियुक्तीने/बाह्यस्त्रोताद्वारे
२	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	१	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्तीने
					एकूण	०२	

११- विधी विभाग

अ. क्र.	पदनाम	समकक्ष पद	वेतनस्तर			मंजुर पदे	नियुक्तीचा मार्ग
१	मुख्य विधी अधिकारी	मुख्य विधी अधिकारी	S-२०	५६१००	१७७५००	१	प्रतिनियुक्ती
२	वरिष्ठ लिपिक	वरिष्ठ लिपिक	S-८	२५५००	८११००	१	पदोन्नती/प्रतिनियुक्तीने
३	लिपीक टंकलेखक	लिपीक टंकलेखक	S-६	१९९००	६३२००	१	नामनिर्देशन/ प्रतिनियुक्तीने
					एकूण	०३	
					एकूण पदे	१६०	

(सुबराव ना. शिंदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट- क

महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम-२०१६ च्या कलम १२ पोटकलम १, २ व ३ मधील तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांसाठीची विहित शैक्षणिक व इतर अर्हता

(अतांत्रिक व तांत्रिक पदांसाठी)

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
१	२	३	४	५
१	प्रशासकीय सेवा (Cadre Post)	महानगर आयुक्त - ०१	प्रतिनियुक्ती - १००%	महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ च्या प्रकरण ३ कलम १२ पोटकलम (१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाकडून महानगर आयुक्तांची नियुक्ती भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांच्यामधून करण्यात येईल. शासन आदेशाद्वारे महानगर आयुक्तांचे वेतन आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती वेळोवेळी निर्धारीत करतील.
२	प्रशासकीय सेवा (गट - अ)	सह आयुक्त (प्रशासन) -०१ एस-२७ (वेतन श्रेणी ११८५००-२१४१००)	प्रतिनियुक्ती - १००%	**१) शासन विभागाकडील समकक्ष पद व विभाग** - अतिरीक्त जिल्हाधिकारी/ अतिरीक्त जिल्हाधिकारी (निवड श्रेणी)/ सह सचिव / उप सचिव दर्जाच्या प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती. **२) वेतन श्रेणी:-** शासनाने वेळोवेळी अतिरीक्त जिल्हाधिकारी / अतिरीक्त जिल्हाधिकारी (निवड श्रेणी)/ सह सचिव / उप सचिव दर्जाचे प्रशासन सेवेतील अधिकारी पदास मंजूर केलेली वेतनश्रेणी. (एस-२७/एस-२५)

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
		एस-२५ (वेतन श्रेणी ७८८००-२०९२००)		**३) अटी व शर्ती :-** महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे इ. काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० नुसार व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रतिनियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित करतील त्या शासन निर्णयामधील प्रचलित नियम, अटी व शर्तीनुसार
३	प्रशासकीय सेवा (गट-अ)	उप आयुक्त -०२ (अनधिकृत बांधकाम व जमीन मालमत्ता) एस-२३ (वेतन श्रेणी ६७७००-२०८७००) एस-२० (वेतन श्रेणी ५६१००-१७७५००)	प्रतिनियुक्ती-१०० %	**१) शासन विभागाकडील समकक्ष पद व विभाग:-** उप जिल्हाधिकारी / उप जिल्हाधिकारी (निवड श्रेणी), महसूल विभाग, महाराष्ट्र शासन या पदावरील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती. **२) वेतन श्रेणी :-** शासनाने वेळोवेळी उप जिल्हाधिकारी/उप जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) पदास मंजूर केलेली वेतनश्रेणी. (एस-२३/एस-२०) **३) अटी व शर्ती :-** महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे इ. काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० नुसार व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रतिनियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित करतील त्या शासन निर्णयामधील प्रचलित नियम, अटी व शर्तीनुसार
४	प्रशासकीय सेवा (विधी) (गट-अ)	मुख्य विधी अधिकारी -०१ एस-२०(वेतन श्रेणी ५६१००-१७७५००)	प्रतिनियुक्ती १०० %	**१) शासन विभागाकडील समकक्ष पद व विभाग:-** राज्य शासनाकडील समकक्ष विधी अधिकारी श्रेणी-१ या पदावरील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती. **२) वेतन श्रेणी :-** एस-२०(वेतन श्रेणी ५६१००-१७७५००) **३) अटी व शर्ती :-** महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
				बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे इ. काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० नुसार व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रतिनियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित करतील त्या शासन निर्णयामधील प्रचलित नियम, अटी व शर्तीनुसार
५	प्रशासकीय सेवा (गट-अ)	व्यवस्थापक विपणन -०१ एस-२०(वेतन श्रेणी ५६१००-७७५००)	बाह्यस्त्रोताद्वारे	**बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्तीचा मार्ग :- सदरहू पद बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात येते.** **(१) शैक्षणिक अर्हता -** (एक) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी (दोन) व्यवसाय व्यवस्थापन MBA (Marketing) मधील पदवी. (तीन) नामांकित व्यावसायीक / खाजगी आस्थापना /खाजगी उपक्रम/सार्वजनिक उपक्रम यामधील वाणिज्यीक संस्थेत दोन वर्षाचा मार्केटींग क्षेत्राचा अनुभव.
६	प्रशासकीय सेवा (गट-अ)	तहसिलदार- ०२ (अनधिकृत बांधकाम व जमीन मालमत्ता) एस-१९ (वेतन श्रेणी ५५१००-१७५१००)	प्रतिनियुक्ती-१०० %	**१) शासन विभागाकडील समकक्ष पद व विभाग:** तहसिलदार, महसूल विभाग, राज्य शासनाकडील तहसिलदार संवर्गामधील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती. **२) वेतन श्रेणी :-** शासनाने वेळोवेळी तहसिलदार पदास मंजूर केलेली वेतनश्रेणी(एस-१९) **३) अटी व शर्ती :-** महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे इ. काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० नुसार व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रतिनियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित करतील त्या शासन निर्णयामधील प्रचलित नियम, अटी व शर्तीनुसार

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
७	प्रशासकीय सेवा (गट-अ)	माहिती व जनसंपर्क अधिकारी -०१ एस-१८ (वेतन श्रेणी ४९१००-१५५८००)	प्रतिनियुक्ती- १०० %	**१) शासन विभागाकडील समकक्ष पद व विभाग :-** जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय या पदावरील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती. **२) वेतन श्रेणी :-** शासनाने वेळोवेळी जनसंपर्क अधिकारी, पदास मंजूर केलेली वेतनश्रेणी.(एस-१८) **३) अटी व शर्ती :-** १) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे इ. काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० नुसार व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रतिनियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित करतील त्या शासन निर्णयामधील प्रचलित नियम, अटी व शर्तीनुसार सदरच्या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती होईपर्यंत, सेवानिवृत्त जिल्हा माहिती अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करता येईल.
८	प्रशासकीय सेवा (गट-ब)	कक्ष अधिकारी-०१ एस-१७ (वेतन श्रेणी ४७६००-१५११०)	प्रतिनियुक्ती-१०० %	**१) शासन विभागाकडील समकक्ष पद व विभाग:-** मंत्रालय स्तरावरील संवर्गामधून कक्ष अधिकारी / मुख्याधिकारी (श्रेणी-२) अथवा राज्यशासनातील प्रशासकीय सेवेतील समकक्ष दर्जाचे अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने **२) वेतन श्रेणी :-** शासनाने वेळोवेळी मंत्रालय स्तरावरील संवर्गामधून कक्ष अधिकारी/ मुख्य अधिकारी, नगर परिषद, गट-ब, नगर विकास विभाग पदास मंजूर केलेली वेतनश्रेणी. (एस-१७) **३) अटी व शर्ती :-** महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
				बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे इ. काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० नुसार व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रतिनियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित करतील त्या शासन निर्णयामधील प्रचलित नियम, अटी व शर्तीनुसार
१०	प्रशासकीय सेवा (गट-ब)	स्वीय सहाय्यक लघुलेखक उच्चश्रेणी -०१ एस-१६ (वेतन श्रेणी ४४९००-१४२४००)	प्रतिनियुक्ती-१०० %	**१) शासन विभागाकडील समकक्ष पद व विभाग:-** राज्य शासनाच्या इतर विभागातील लघुलेखक उच्चश्रेणी या पदावरील अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती. **२) वेतन श्रेणी :-** एस-१६ (वेतन श्रेणी ४४९००-१४२४००) **३) अटी व शर्ती :-** महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे इ. काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० नुसार व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रतिनियुक्ती संदर्भात वेळोवेळी निर्गमित करतील त्या शासन निर्णयामधील प्रचलित नियम, अटी व शर्तीनुसार सदर पदाकरिता शासनाने विहीत केलेले सेवाप्रवेश नियम लागू राहतील.
११	प्रशासकीय सेवा (गट-क)	अधिक्षक-०१ एस-१४ (वेतन श्रेणी ३८६००-१२२८००)	पदोन्नती- १०० %	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आस्थापनेवरील उप अधिक्षक/उपलेखापाल हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सलग सेवा झालेल्या व्यक्तीमधुन " सेवा ज्येष्ठता अधिन पात्रता" या निकषावर काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने भरण्यात येईल. सदर पदाकरिता शासनाने विहीत केलेले सेवाप्रवेश नियम लागू राहतील. **सदरचे पद पदोन्नतीने उपलब्ध होईपर्यंत प्रतिनियुक्तीने भरता येईल.**

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
१२	प्रशासकीय सेवा (गट-क)	उपअधिक्षक / उपलेखापाल - ०४ एस-१३ (वेतन श्रेणी ३५४००-११२४००)	पदोन्नती- १००%	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सलग सेवा झालेल्या व्यक्तीमधुन " सेवा ज्येष्ठता अधिन पात्रता" या निकषावर काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने भरण्यात येईल. विधानसभा आश्वासन समितीच्या बैठकीबाबत सदर पदाकरिता शासनाने विहीत केलेले सेवाप्रवेश नियम लागू राहतील. **सदरचे पद पदोन्नतीने उपलब्ध होईपर्यंत प्रतिनियुक्तीने भरता येईल.**
१३	प्रशासकीय सेवा (गट-क)	वरिष्ठ लिपीक- १४ एस-०८ (वेतन श्रेणी २५५००-८११००)	पदोन्नती- १००%	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आस्थापनेवरील लिपीक टंकलेखक हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सलग सेवा झालेल्या व्यक्तीमधून " सेवा ज्येष्ठता अधिन पात्रता " या निकषावर काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने भरण्यात येईल. **सदरचे पद पदोन्नतीने उपलब्ध होईपर्यंत प्रतिनियुक्तीने भरता येईल.**
१५	प्रशासकीय सेवा (गट-क)	लिपीक टंकलेखक -२५ एस-६ (वेतन श्रेणी १९९००-६३२००)	नामनिर्देशन -१०० %	**नामनिर्देशनाव्दारे नियुक्तीचा मार्ग-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे; **सदर पदाकरिता शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे सेवाप्रवेश नियम लागू राहतील.** (क) वयोमर्यादा- (एक) खुल्या वर्गातील व्यक्तीसाठी एकोणीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
				आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या; किंवा शासनाने वेळो वेळी विहीत केलेली वयोमर्यादा. (दोन) वयोमर्यादेची गणना जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास, उपरोक्त प्रमाणे नमूद केलेली किमान व कमाल वयोमर्यादा धारण केलेली असणे आवश्यक राहील. **(ख) शैक्षणिक अर्हता-** (एक) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केलेली आहे; आणि (दोन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनीट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनीट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे; **किंवा** (ग) अनुकंपातत्वावर निवड करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार खंड (ख) च्या उपखंड (एक) व (दोन) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवाराची अनुकंपातत्वावर नियुक्तीने ; परंतु आणखी असे की, सदर पदावर अनुकंपातत्वावर नियुक्त होणारी व्यक्ती खंड (ख) च्या उपखंड (दोन) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण करीत नसेल तर, अशा व्यक्तीने सदर अर्हता प्रमाणपत्र शासनाने वेळोवेळी

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
				निश्चित केलेल्या कालमर्यादेत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा याबाबतीत शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कारवाई करण्यात येईल. किंवा (घ) गट-क मधील वाहन चालक या पदावर किमान तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उपखंड (एक) व (दोन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व लिपिक टंकलेखक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्ती देता येईल. वाहनचालक या पदावरून नियुक्ती दिलेल्या व्यक्तींची लिपिक टंकलेखक पदावरील सेवा ज्येष्ठता लिपिक टंकलेखक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईल; किंवा (क) शासकीय कार्यालयातील समतुल्य पद धारण करणाऱ्या आणि खंड (ख) च्या उपखंड (एक) व (दोन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती भरण्यात येईल; किंवा (छ) परंतु माजी सैनिकांमधून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेवारांनी खंड (ख) च्या उपखंड (दोन) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण केली नसेल तर, अशा उमेदवारास, सदर अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांच्या कालमर्यादेत प्राप्त करील या अटीवर सदर परीक्षेकरीता अर्ज करण्यास परवानगी दिली जाईल.

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
				परंतु असे की, सदर पदावर माजी सैनिकातून नियुक्त झालेल्या व्यक्तीने खंड (ख) च्या उपखंड (दोन) मध्ये विहीत केलेली अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महीन्यांच्या कालमर्यादेत धारण न केल्यास, सदर व्यक्तीची सेवा समाप्त करण्यात योईल. परंतु आणखी असे की, खंड (क) च्या उपखंड (दोन) मध्ये विहीत केलेली उच्चतम वयोमर्यादा ही अनुकंपा किंवा पदवीधर अंशकालीन यासारख्या पसंतीक्रमांतर्गत आणि माजी सैनिक, अपंग, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त व खेळाडू या सारख्या समांतर आरक्षणांतर्गत वर्गातून नियुक्त करावयाच्या उमेदवारांना लागु राहणार नाही. या सारख्या वर्गातील उमेदवारांना शासनाने वेळोवेळी घोषित केलेले उच्चतम वयोमर्यादे संदर्भातील प्रचलित धोरण लागू राहील. **सदरचे पद नामनिर्देशनने उपलब्ध होईपर्यंत प्रतिनियुक्तीने भरता येईल.**
१६	प्रशासकीय सेवा (गट-क)	वाहन चालक-०२ एस-६ (वेतन श्रेणी १९९००-६३२००)	बाह्यस्त्रोताव्दारे	**१) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधुन सदरहू पद बाह्यस्त्रोताव्दारे भरण्यात यावे -** (एक) ज्याचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नाही; किंवा शासनाने वेळो वेळी विहीत केलेली वयोमर्यादा. (दोन) ज्यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना धारण केला आहे; (तीन) ज्यांनी शासन मान्यता प्राप्त शाळेतुन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
				परीक्षा उत्तीर्ण केली आहे; (चार) शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा तीन वर्षाहुन कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव धारण केला आहे; (पाच) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक; (सहा) ज्यांचा वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख आहे व ज्यांचेकडे चांगली शारीरिक क्षमता आहे; टिप :- " वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख " यामध्ये खालील बाबी येतात :- (अ) वाहनचालक कोणतीही मादक द्रव्ये किंवा अल्कोहोल सेवन करून वाहन चालविण्याचा किंवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणत्याही दखल पात्र अपराधासाठी दोषी सिद्ध झालेला नसावा. (आ) वाहन चालका विरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल झालेला नसावा. (सात) ज्यांना संबंधित क्षेत्राची परिपूर्ण भौगोलिक माहिती आहे; आणि शासनाने या संदर्भात विहीत केलेले सेवाप्रवेश अटी, (आठ) ज्यांना मराठी, हिंदी, भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे:परंतु सदर पदावरील नियुक्तीसाठी खंड (ग) च्या उप खंड (चार) नुसार विहित केलेल्या कालावधीचा अनुभव धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, निवड समितीच्या शिफारशीनुसार अनुभव कालावधी १ वर्षापर्यंत शिथिल करता येईल.

अ.क्र.	संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. प्रतिनियुक्ती २. नामनिर्देशन ३. पदोन्नती	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीची पद्धती
